
# प्राकृत सट्टक (नाट्य ) साहित्य





# प्राकृत सट्टक (नाट्य ) साहित्य परिचय

## प्रास्ताविक

लोकांचे मनोरंजन करण्यासाठी प्रत्येक जाती–धर्माच्या भाषा साहित्यामध्ये कथा–कथन, गायन, नृत्य तसेच विविध प्रकारच्या आवाजाची नक्कल करणे किंवा हावभाव, हालचालींच्या माध्यमातून एखाद्या विषयाचे स्पष्टीकरण करण्याची पद्धत प्राचीन काळापासून असलेली दिसून येते. यातूनच नाट्याची, नाटकाची निर्मिती झालेली असावी. त्यामुळे प्रत्येक भाषेच्या साहित्यात नाट्यसाहित्यास विशेष महत्त्व असलेले दिसून येते.

संस्कृत विद्वानांनी आपल्या नाटकांमध्ये प्रमुख पात्रांच्या तोंडी संस्कृतभाषा तर नायिका, स्त्रिया, बालक, नोकर, दास इत्यादी पात्रांच्या तोंडी प्राकृतातील विविध भाषांचा उपयोग केलेला दिसून येतो. अशा प्रकारची नाटके प्रारंभी राजदरबारात किंवा नगरातील लोकांच्यासाठीच मर्यादित होती.

परंतु राजदरबारापेक्षा किंवा नगरापेक्षाही ग्रामीण भागातील लोकांचे मनोरंजन करण्यात नाट्याचे प्रयोग अधिक यशस्वी होत असलेले पाहून संस्कृत नाटकांत प्राकृतभाषेचे प्राबल्य वाढत गेले. शिवाय प्रमुख पात्रांच्या म्हणजेच राजा, मंत्री आदींच्याही तोंडी प्राकृतभाषेचा वापर होऊन कालांतराने प्राकृत भाषेतही संपूर्ण नाट्यग्रंथ लिहिले गेले. त्या नाट्यग्रंथालाच सट्टक असे संबोधण्यात येऊ लागले.

इ.स. 9 व्या शतकात होऊन गेलेले संस्कृत–प्राकृत भाषापंडित राजशेखर यांनी 'कर्पूरमंजरी' हे प्राकृत भाषेतील पहिले सट्टक लिहिले असे मानले जाते. कदाचित त्यांच्याही अगोदर सट्टके लिहिली असावीत परंतु दुर्दैवाने आज ती उपलब्ध नाहीत. कदाचित काळाच्या प्रवाहात ती नष्ट झालेली असावीत किंवा ती नाटके इतर भाषेत रूपांतरितही झालेली असतील.

## सट्टकाची वैशिष्ट्ये

प्रत्येक भाषेतील कथानकांची काव्यांची, नाटकांची काही खास वैशिष्ट्ये असतात. त्याप्रमाणे प्राकृत सट्टकांचीही काही वैशिष्ट्ये असलेली दिसून येतात. ती पुढीलप्रमाणे.

1) सट्टकाची रचना प्राकृतभाषेत असते.
2) सट्टकात संस्कृतातील प्रवेशक, विष्कंभक, अंक, संधी इ. चा अभाव असतो. सट्टकात अंकाऐवजी 'जवनिका' या शब्दांचा उपयोग केला जातो.
3) नाटिकेप्रमाणे सट्टकाचे कथानक काल्पनिक असते.
4) नायक व नायिका राजकुलोत्पन्न असतात.
5) सट्टकातील नायक हा विवाहित असूनही अविवाहित तरुण नायिकेवर गुप्तपणे प्रेम करत असलेला दिसून येतो.

6) नायकाची पत्नी (प्रमुख राणी) नायकावर सतत वर्चस्व गाजविणारी असते.

7) कथेमध्ये अद्भुत आणि शृंगार रसाचे प्राबल्य अधिक असले तरीही सट्टकात रौद्र, वीर, बीभत्स या रसांचा उपयोग केला जात होता.

8) सट्टकात पुरुषपात्रापेक्षाही स्त्री पात्रांची संख्या अधिक असते.

9) सट्टकाच्या कथानकाचा शेवट राजा व नायिका यांच्या प्रेमाचे रूपांतर विवाहात झालेले दिसून येते.

10) सट्टक हे चार जवनिकेने युक्त कथानक असते.

प्राकृतातील प्रमुख सट्टके पुढीलप्रमाणे

1) कर्पूरमंजरी (राजशेखर) 2) शृंगारमंजरी (विश्वेश्वर)

3) चंद्रलेखा (रुद्रदास) 4) आनंदसुंदरी (घनश्याम)

5) रंभामंजरी (नयचंद्र)

# 1. कर्पूरमंजरी (राजशेखर)

**प्रास्ताविक :**

संस्कृत साहित्याप्रमाणे प्राकृत साहित्यामध्येही जे नाट्यसाहित्य उपलब्ध असलेले दिसून येते. या नाट्य साहित्यासच सट्टक म्हटले जाते. प्राकृत साहित्यात आज चार-पाच सट्टकेच उपलब्ध आहेत. त्यामध्ये राजशेखरांचे 'कर्पूरमंजरी' हे पहिले प्राकृत सट्टक असल्याचे मानले जाते. त्याचा परिचय पुढीलप्रमाणे.

**1) सट्टककार राजशेखरांचा परिचय :**

कवी राजशेखर हे ब्राह्मण कुळात जन्मलेले असून विद्वत्ता त्यांच्या कुळात परंपरेने चालत आलेली होती. त्यांच्या कुळात अकालजलद नावाचे एक श्रेष्ठ कवी होऊन गेले. ते राजशेखरांचे आजोबा होते. त्यांना 'महाराष्ट्र चूडामणी' ही पदवी मिळालेली होती.

दुर्दुक (दुहिक) हे त्यांच्या पित्याचे आणि शीलवती आईचे नाव होते. ते गुर्जर राजाच्या दरबारातील एक मंत्री होते. त्यामुळे राजशेखरांनाही दरबारात मानाचे स्थान होते. राजशेखरांनी चौहान कुळातील अवंतीसुंदरीशी प्रेमविवाह केला होता. त्यांची पत्नीही संस्कृत, प्राकृतात निपुण होती. तिला प्राकृत भाषेविषयी अधिक आवड होती. तिच्या आग्रहानेच राजशेखरांनी 'कर्पूरमंजरी' हे सट्टक लिहिल्याचे तसेच विदर्भ व कुंतल देशाविषयी कवींच्या मनात अधिक आदरभाव असल्यानेच ग्रंथांत नमूद केलेले आहे. कर्पूरमंजरी ही कुंतलाधिपतीची कन्या असल्याचे तर विभ्रमलेखा ही दक्षिणाधिपतीची (विदर्भराजाची) कन्या असल्याचा उल्लेख केला आहे.

राजशेखरांनी कर्पूरमंजरी या सट्टकाशिवाय 'विद्धशाल-भंजिका, बालरामायण, बालभारत' इ.

संस्कृत नाटके लिहिली. याशिवाय अलंकारशास्त्रावरील 'काव्यमीमांसा' आणि 'हरविलास महाकाव्य' इत्यादी ग्रंथ लिहिले. भौगोलिक विषयावर माहिती देणारा भूवनकोश नावाचा ग्रंथ लिहिला. अशा प्रकारच्या विविध ग्रंथरचनांमुळे राजशेखरांना बालकवी, कविराज, भाषाचतुर इ. विशेषणांनी सन्मानित केले होते. तसेच गुजरातच्या महेंद्रपालराजांनी राजशेखरांना आपला गुरू मानून त्यांना दरबारात मानाचे स्थानही दिलेले होते. राजशेखरांचा काळ 9–10 व्या शतकाचा मानला जातो.

## कर्पूरमंजरी सट्टकाचा परिचय :

प्रस्तावनेनंतर राजाचंद्रपाल राणी विभ्रमलेखा, विदूषक आणि विचक्षणा दासी इत्यादी सर्वजण उद्यानात जाऊन वसंत उत्सव (ऋतू) आणि मलयपर्वताकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचे वर्णन करत असतात.तेव्हा तेथे अचानकपणे भैरवानंद नावाचा योगी येऊन स्वत:च्या शक्तीचे वर्णन करतो. शिवाय माझ्याकडून तुम्हास काय अपेक्षित आहे असे विचारतो, तेव्हा विदूषकाच्या सांगण्यावरून भैरवानंद योगी योगसामर्थ्याने विदर्भातील कुंतल देशाच्या वल्लभराज राजाच्या कर्पूरमंजरी नावाच्या तरुण सुंदर राजकन्येस घेऊन येतो.

विभ्रमलेखा राणी भैरवानंद योग्याची भक्त, शिष्या असल्याने त्याच्या सांगण्यानुसार कर्पूरमंजरीस आपल्याकडे ठेऊन घेते. परंतु कर्पूरमंजरीचे तारुण्य व सौंदर्य पाहून राजा तिच्याकडे आकर्षित होतो. कर्पूरमंजरीच्या मनामध्येही चंद्रपालराजाविषयी प्रेमभाव निर्माण होतात.

### दुसऱ्या जवनिकेमध्ये :

राजा कर्पूरमंजरीच्या प्रेमात पडल्याने व्याकूळ झालेला आहे. तर इकडे कर्पूरमंजरीही राजाच्या प्रेमाने व्याकूळ होऊन विरह सहन करते. तेव्हा विदूषक व विचक्षणा दासी या दोन प्रेमिकांची भेट व्हावी म्हणून प्रयत्न करतात.

कर्पूरमंजरी आपले प्रेम प्रकट करण्यासाठी केवड्याच्या पानावर मजकूर लिहून राजाकडे पाठविते राजाही त्या प्रेमास आपली अनुकूलता दर्शविते. परंतु हा सर्व प्रकार विभ्रमलेखाराणीच्या लक्षात आल्याने त्यांच्या भेटीवर बंदी घालते.

### तिसऱ्या जवनिकेमध्ये :

विरहाने व्याकूळ झालेल्या दोघा प्रेमिकांची भेट घडवून आणण्यासासाठी विदूषक व विचक्षणा दासी उद्यानापासून राजवाड्यापर्यंत असलेल्या गुप्त मार्गाचा (भुयार) उपयोग करतात.

### चौथ्या जवनिकेमध्ये :

विभ्रमलेखाराणी राजास वटसावित्रीचा उत्सव पाहण्याचे निमंत्रण देते. त्या निमंत्रणास मान देऊन राजा भैरवानंद, विदूषक आदी सर्व हजर राहतात. तेव्हा भैरवानंद योगी विभ्रमलेखा राणीस गुरुदक्षिणा म्हणून कर्पूरमंजरी आणि चंद्रपाल राजाच्या विवाहास राणीने मान्यता देण्याची अट घालतो. कारण या विवाहाने चंद्रपाल राजास चक्रवर्तीपदाचा मान मिळण्याचे भविष्य सांगतो. त्यामुळे राणी स्वत:हून राजा व कर्पूरमंजरी यांचा विवाह लावून देते. अशाप्रकारे कर्पूरमंजरी सट्टकाचे कथानक असलेले दिसून येते.

### भाषाशैली :

'कर्पूरमंजरी' हे महाराष्ट्री प्राकृत भाषेतील सट्टक असले तरीही गद्यासाठी शौरसेनी प्राकृतचा तर पद्यासाठी महाराष्ट्री प्राकृत भाषेचा उपयोग केलेला दिसून येतो. राजा व कर्पूरमंजरी यांच्या प्रेमातून शृंगाररस स्पष्ट होतो. विदूषक आणि विचक्षणा दासी यांच्या भांडणातून विनोद व हास्यनिर्मिती झालेली दिसून येते.

पद्यामध्ये वसंततिलका अनुप्रास, उपमा, उत्प्रेक्षा आदी विविध अलंकारांचा वापर केलेला दिसून येतो. सूर्योदय, चंद्रोदय, वसंतऋतू संध्याकाळ इ. मधून निसर्गवर्णनेही साकारलेली दिसून येतात. अशाप्रकारे कर्पूरमंजरी सट्टकाची भाषाशैली आकर्षक केलेली दिसून येते.

## 2. शृंगारमंजरी (विश्वेश्वर)

### प्रास्ताविक :

प्राकृत सट्टकांपैकी शृंगारमंजरी हे एक महत्त्वपूर्ण सट्टक असल्याचे दिसून येते. ज्याप्रमाणे कर्पूरमंजरी हे प्राकृत साहित्यातील पहिले सट्टक आहे. त्याप्रमाणे शृंगारमंजरी हे प्राकृत साहित्यातील शेवटचे सट्टक असल्याने या सट्टकासही प्राकृत साहित्यात अधिक महत्त्व असलेले दिसून येते. या सट्टकाची रचना कवी विश्वेश्वरांनी केलेली आहे. या सट्टकाचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे.

### सट्टककार (कवी) विश्वेश्वर यांचा परिचय :

कवी विश्वेश्वर हे अलमोडा (कर्नाटक) येथील असून ते भारद्वाज वंशात जन्मलेले होते. त्यांच्या वडिलांचे नाव लक्ष्मीधर होते. लक्ष्मीधर हे काव्यशास्त्र, तर्कशास्त्र, न्यायशास्त्र इ. विविध शास्त्रामध्ये निपूण होते. शिवाय ते संस्कृत-प्राकृत भोषेचे विद्वानही होते. विविध विद्या शिकविणारे गुरूही होते. त्यांच्याकडून विश्वेश्वरांना संस्कृत, प्राकृत भाषेचे ज्ञान मिळाले. त्यामुळे विश्वेश्वर वयाच्या 10 व्या वर्षांपासून ग्रंथरचना करत होते. विश्वेश्वरांनी काव्यशास्त्र, व्याकरणशास्त्र, धर्मशास्त्र, तंत्रशास्त्र, नाट्यशास्त्र इ. विषयावर ही ग्रंथरचना केलेल्या दिसून येतात.

शृंगारमंजरी हे सट्टक लिहिण्यापूर्वी कर्पूरमंजरी रत्नावली, मालविकाग्निमित्र इ. संस्कृत नाट्यग्रंथाचाही त्यांनी अभ्यास केलेला दिसून येतो.विश्वेश्वरांचा काळ अलिकडचा म्हणजे 18 व्या शतकाचा मानला जातो.

### शृंगारमंजरी सट्टकाचा संक्षिप्त परिचय :

शृंगारमंजरी सट्टकाची रचना विश्वेश्वरांनी केलेली आहे. त्यांच्या या सट्टकावर राजशेखरांच्या कर्पूरमंजरी सट्टकाचा अत्यंत प्रभाव असलेला दिसून येतो. शृंगारमंजरी सट्टक म्हणजे कर्पूरमंजरी सट्टकाची दुसरी आवृत्ती असावी एवढे साम्य या दोन्ही सट्टकांमध्ये असलेले दिसून येते.

**प्रथम जवनिका :**

शृंगारमंजरी सट्टकातील प्रथम जवनिकेमध्ये प्रारंभी नांदी असून यामध्ये सूत्रधार आणि नटी यांच्या संवादातून आज शृंगारमंजरी सट्टकाचा प्रयोग सादर केला जाणार असल्याची सूचना केली जाते. या सूचनेनुसार सट्टकास प्रारंभ होतो.

प्रारंभी राजा विदूषक उद्यानामध्ये जाऊन गप्पागोष्टी करत असताना राजा विदूषकास म्हणतो, 'हे मित्रा, आज माझ्या स्वप्नामध्ये एक सुंदरी आली होती, असे म्हणून राजा स्वप्नसुंदरीचे सौंदर्य वर्णन करतो. तेव्हा वसंततिलकादासी चोरून हा संवाद ऐकते व हे सौंदर्यवर्णन कोणाचे असेल?' असा विचार करत असता हे सौंदर्य आपली मैत्रीण शृंगारमंजरीचेच असल्याचे जाणून ती आनंदित होते.

**द्‌वितीय जवनिका :**

या जवनिकेमध्ये विदूषकाचा प्रथम प्रवेश होतो. आपला मित्र व नायक असलेल्या राजाची त्याच्या स्वप्नसुंदरीशी कशी भेट घडून येईल? याचे चिंतन करत असतो. तेव्हा सुदैवाने मुख्यराणीकडून मदन उत्सवाच्या पूजेचे निमंत्रण येते. तेव्हा आनंदित होऊन मदन-उत्सव पाहण्यासाठी राजा व विदूषक जातात.

या मदनउत्सवाच्या वेळी विदूषक व वसंतसेना हे दोघे आपापल्या बुद्धिचातुर्याने निसर्गाचे वर्णन करत असतात. या वर्णनातील श्रेष्ठ वर्णन कोणाचे आहे. याचा निर्णय देण्यासाठी विविध शास्त्रामध्ये निपुण असलेल्या शृंगारमंजरीस निमंत्रित करण्यात येते. अशाप्रकारे राजा व शृंगारमंजरीची भेट घडवून आणली जाते.

**तिसरी जवनिका :**

या जवनिकेमध्ये नायक व नायिकेच्या परस्परांच्या भेटीगाठीमुळे प्रेमामध्ये वृद्‌धी झालेली दिसून येते. परंतु राणीस हे प्रेमप्रकरण न आवडल्याने राजा व शृंगारमंजरी यांच्या भेटीवर राणी बंदी घालते. परंतु विदूषक व वसंतसेना यांच्या मदतीने माधवीलता उद्यानामध्ये राजा व शृंगारमंजरी यांच्या गुप्त भेटी होत राहतात.

**चौथी जवनिका :**

राजा व शृंगारमंजरी यांच्या गुप्त भेटीचा वृत्तांत समजल्याने शंकित झालेली राणी शृंगारमंजरीस अंधारकोठडीमध्ये बंदिस्त ठेवते. शिवाय विदूषक व वसंततिलका दासी यांच्या भेटीवरही बंदी घालते. कालांतराने राणी पार्वती देवतेच्या दर्शनासाठी गेली असता तेथे आकाशवाणी होते. 'पतीची सेवा करणे हाच पतिव्रतेचा श्रेष्ठ धर्म आहे. तसेच निरपराधी व्यक्तीस दुःख देणे हे (अयोग्य) पापकर्म आहे.' ही आकाशवाणी ऐकल्याने राणीच्या मनामध्ये परिवर्तन होऊन शृंगारमंजरी व राजा यांचा स्वतःहून विवाह करून देते. अशाप्रकारे शृंगारमंजरी सट्टकाचे कथानक असलेली दिसून येते.

**भाषाशैली :**

व्याकरण ग्रंथाच्या आधारे काही रूपे तयार करून त्याचा उपयोग केलेला दिसून येतो. पद्यामध्ये महाराष्ट्री प्राकृत असल्याने 'अ' श्रुतीचा अधिक वापर झालेला दिसून येतो. गद्यात शौरसेनी भाषा आढळते. प्राकृत साहित्यातील हे एक महत्त्वपूर्ण **सट्टक** आहे.

# 3. चंद्रलेखा सट्टक (रुद्रदास)

**प्रास्ताविक :**

'चंद्रलेखा' हे प्राकृतसाहित्यातील महत्त्वपूर्ण सट्टक होय. याची रचना कवी रुद्रदास यांनी केली. त्याचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे

**सट्टककार रुद्रदासाचा परिचय**

कवी रूद्रदास यांनी चंद्रलेहा या सट्टकाची रचना केली. रूद्रदास हे केरळमधील पारासव जातीत जन्मले होते. रुद्रदासाचे आई-वडील केरळमधील एका मंदिरात स्वच्छता व इतर काम करत असत. रूद्रदासांचे संस्कृत भाषेवर चांगले प्रभुत्व होते.रूद्रदासांनी वररुचींच्या 'प्राकृत प्रकाश' या व्याकरण ग्रंथाचा सखोल अभ्यास करून प्राकृत भाषेवर चांगले प्रभुत्व मिळविले होते. त्यांनी इ. 1660 मध्ये कर्पूरमंजरी या सट्टकाच्या धर्तीवर 'चंदलेहा' या सट्टकाची रचना केली.

कवी रुद्रदास हे रुद्र व श्रीकंठ गुरूंचे शिष्य होते. शिवाय रुद्र म्हणजे शिव. ते शिवाचेही परमभक्त होते. त्यामुळे त्यांनी रुद्रदास हे नाव धारण केलेले असावे. त्यांचा काळ 17 व्या शतकाचा मानला जातो. इ. स. 1660 मध्ये त्यांनी 'चंद्रलेखा' या सट्टकाची रचना केली.

**चंद्रलेखा ग्रंथाचा परिचय :**

'चंद्रलेखा' हे प्राकृत साहित्यातील एक सट्टक होय. कवी रूद्रदास यांनी या चंद्रलेखा सट्टकाची रचना केली या सट्टकात चार जवनिका असून राजा मानवेंद्र आणि चंद्रलेखा राजकुमारीच्या प्रेमाची कथा वर्णिलेली आहे.

**'चंद्रलेखा' सट्टकाचा विषय –** चंद्रलेखा या सट्टकात चिंतामणिरत्नाच्या सामर्थ्याने मानवेंद्र राजा आणि चंद्रलेखा नायिकेची भेट घडून येते. या पहिल्या भेटीतच नायक मानवेंद्र राजा आणि चंद्रलेखा नायिका परस्परांवर आकर्षित होऊन परस्परांच्या प्रेमात पडून भेटीस आतुर होतात.

चंद्रलेखा संगीतकलेत निपुण असते. हे जाणून महाराणी चंद्रलेखेचे गायन ऐकण्याच्या उद्देशाने चंद्रलेखेच्या संगीत-गायनाच्या कार्यक्रमाचे नियोजन करते. त्या कार्यक्रमाचा राजाकडून मनमुराद आस्वाद घेतला जातो. त्यामुळे राजा चंद्रलेखेच्या भेटीस अधिकच आतुर होतो.

त्यानंतर चंद्रलेखा आणि राजा यांच्या प्रेमाची राणीस शंका आल्याने राणी राजसभेतील एका मूर्तीच्या कंठात सारिका बसवते. त्यामुळे राणीस मानवेंद्र राजा आणि चंद्रलेखाच्या प्रेमाचा वृत्तांत समजतो. त्यामुळे महाराणी अत्यंत क्रोधिष्ठ होते.

त्यानंतर राणीचा चंद्रकेतू मावसभाऊ अचानकपणे तेथे येऊन चंपावनातून आपली बहीण चंद्रलेखा अचानकपणे नष्ट झाल्याचा वृत्तांत सांगतो. ते ऐकून महाराणी आपल्याकडे असलेल्या चिंतामणी रत्नास विनंती करते. आपल्या चंद्रलेखा बहिणीचा शोध घेऊन ताबडतोब येथे आणावे. त्याप्रमाणे चंद्रलेखा ताबडतोब तेथे हजर होते. त्यामुळे सर्वजण आनंदित होतात.

त्यानंतर त्या चिंतामणिरत्नाची देवता सर्वांच्या समोर स्पष्ट करते. 'चंद्रलेखेशी विवाह करणारी व्यक्ती चक्रवर्ती सम्राट होईल' ते ऐकून महाराणीच्या मनात 'आपला पती चक्रवर्ती सम्राट व्हावा' अशी तीव्र इच्छा निर्माण झाल्याने राजा मानवेंद्र आणि चंद्रलेखा यांच्या विवाहाला महाराणी स्वत: होऊन अनुमती देते. अशाप्रकारे दोन प्रेमिकांच्या प्रेमाची पूर्णता झालेली दिसून येते.

**भाषाशैली :**

'चंद्रलेखा' या सट्टकाची भाषा महाराष्ट्री प्राकृत आहे. कवीने मोजक्या शब्दांत सुंदर चित्रण केलेले दिसून येते. इतर सट्टकाप्रमाणे या सट्टकातही शृंगार रसाचा अधिक प्रभाव आहे. तसेच चिंतामणी रत्नाच्या प्रभावाने अद्‌भुत रसाचाही उपयोग झालेला दिसून येतो.

## ब्राम्ही लिपीतील स्वर आणि व्यंजने

### स्वर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 𑀅 | 𑀆 | 𑀇 | 𑀈 | 𑀉 | 𑀊 | 𑀏 | 𑀐 | 𑀑 | 𑀒 | 𑀅𑀁 | 𑀅𑀂 |
| अ | आ | इ | ई | उ | ऊ | ए | ऐ | ओ | औ | अं | अः |

### व्यंजने

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 𑀓 | 𑀔 | 𑀕 | 𑀖 | 𑀗 |
| क | ख | ग | घ | ङ |
| 𑀘 | 𑀙 | 𑀚 | 𑀛 | 𑀜 |
| च | छ | ज | झ | ञ |
| 𑀝 | 𑀞 | 𑀟 | 𑀠 | 𑀡 |
| ट | ठ | ड | ढ | ण |
| 𑀢 | 𑀣 | 𑀤 | 𑀥 | 𑀦 |
| त | थ | द | ध | न |
| 𑀧 | 𑀨 | 𑀩 | 𑀪 | 𑀫 |
| प | फ | ब | भ | म |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 𑀬 | 𑀭 | 𑀮 | 𑀯 | 𑀰 | 𑀱 | 𑀲 | 𑀳 |
| य | र | ल | व | श | ष | स | ह |